
गुरुमंत्र

# परवडणारी शेती करा; समृद्धीची कास धरा!



दिलीपराव देशमुख बारडकर
वर्धा
मो.नं. ९८८१४९७०९२



प्रचलित रासायनिक शेती पद्धती महागडी तसेच सर्वांचेच (शेतकरी, ग्राहक, निसर्ग) नुकसान करणारी व खर्चिक असल्याने शेतकरी पर्याय शोधत आहेत. नैसर्गिक शेती, झिरो' बजेट शेती, अर्धरासायनिक शेती, सेंद्रिय शेती, विषमुक्त शेती, रेसिड्यू फ्री शेती, जैविक शेती, बायोडायनामिक शेती यापैकी नेमकी कोणती शेती पद्धती निवडावी या संभ्रमात व बौद्धिक गोंधळात ते आता आहेत. शासन, कृषी विभाग व कृषी विद्यापीठांतूनही नेमके मार्गदर्शन नाही. पीकनिहाय सेंद्रिय शेती पुस्तिकाही कुठे उपलब्ध नाहीत, यास्तव हा विवेचनाचा प्रपंच...

माझा मागील एकवीस वर्षांचा अनुभव, वाचन, लेखन व अभ्यास सांगतो की, शेतकऱ्याने सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीत मधमाश्यांसारखे वागावे. आपली मधाची पोळी (शेती) समृद्ध व परवडणारी करण्यासाठी जेथे जेथे सुंदर फूल व मकरंद (पर्यायी शेतीचा अनुभव) उपलब्ध आहे तेथून तो गोळा करावा व आपली मधाची पोळी (शेती) समृद्ध व कमी खर्चाची करावी. अमूक एका पद्धतीत पडू नये. त्यामागचे विज्ञान समजून घेऊन एकात्मिक पद्धतीचा अवलंब करून त्याची प्रचिती पहावी.

स्थानिक परिस्थिती (जमीन, पीक, हवामान) स्वानुभव व उपलब्ध साधने विचारात घेऊन खालील सुचविलेले मार्गदर्शन लक्षात घेऊन, थोडेफार बदल करून बारकाईने प्रचिती घ्यावी.

* पिकासाठी योग्य असणारी जमीन निवडावी. पाण्याचा संपूर्णपणे निचरा होणारी जमीन आवश्यक. तशी नसल्यास निचरा क्षमता वाढवूनच लागवड करावी. (उदा. चर काढणे, सेंद्रिय कर्ब वाढवणे, गांडुळांची संख्या वाढवणे इ.)

* अति खोल ट्रॅक्टरने नांगरट टाळावी. Shallow till किंवा No till पद्धत अवलंबावी (अपवाद हरळी, लव्हाळा, केना इ. तणांचे शेत)

* हिरवळीचे पीक घेतल्याशिवाय सेंद्रिय पीक घेऊ नये. त्यासाठी ॲरोग्रीन बियाणे मिश्रण (६०% द्विदल, ३०% एकदल व १०% तेलबिया/ औषधी पिकाचे बियाणे) सर्वोत्तम. त्याखालोखाल भाजीपाला घ्यायचा असेल तर धैंचा नाही तर इतर पीक घ्यायचे असेल तर ताग/ बरू हे हिरवळीचे पीक पेरावे. ते ४५-५५ दिवसांनी कापून जमिनीत मिसळावे व नंतरच मुख्य पिकाची पेरणी करावी. जमीन जिवाणू व सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध झाल्यामुळे रासायनिक खते देण्याची गरज नाही.

* मुख्य पिकासोबत योग्य सहयोगी (Symbiotic) मिश्र पिकाची (२ ते ३) पेरणी करावी. एकपीक पद्धत (Monocropping) टाळावे. मजुरी जास्त लागते, काढणी अवघड जाते याचे निमित्त करू नये. आठ प्रमुख फायदे महत्त्वाचे आहेत ते मिळवा.

* मुख्य पिकात सापळा पिके, परोपजीवी मित्रकिडींना आकर्षक, मधमाश्यांना आवडणारी, पक्षीथांब्यास पूरक ठरणारी, पोषण मूलद्रव्ये सहायक, शत्रुकिडींना प्रतिबंधक गुणधर्म असणारी सहयोगी मिश्रपिके म्हणून निवडावीत.

* पेरणीपूर्वी मुख्य व मिश्रपिकांच्या बियाण्याची उगवण शक्ती (Germination percentage) तपासावी. त्यानुसार बियाण्याचे प्रतिएकर प्रमाण ठरवता येते.

* प्रमुख पीक निवडताना त्याच्या सरळ/ सुधारित/ संमिश्र वाणांना (जाती) प्रथम प्राधान्य द्यावे. दुय्यम स्थान संकरित वाणांना द्यावे. जी.एम. (बी.टी.) बियाणे टाळावे.

* पेरणीपूर्वी बियाण्याला बांबूच्या मुळ्यांजवळील किंवा वारुळाची माती, गाईचे शेण, गोमूत्र, दूध, जिवाणू संवर्धक व ट्रायकोडर्मा मिश्रणाचे संस्कार करून, सावलीत वाळवून नंतरच पेरावे.

* शक्य असल्यास पिकांची पेरणी कंटूर पद्धतीनेच करावी. नाही तर नेहमी शेतजमिनीच्या उताराला आडवी व शक्यतो दक्षिणोत्तर पेरणी करावी. त्यामुळे सर्व झाडांना भरपूर सूर्यप्रकाश मिळतो. पृथ्वीच्या उत्तर व दक्षिण ध्रुवांच्या चुंबकीय परिणामामुळे (Polar Magnetic Effect) तसेच चुंबकीय परिणामामुळे (Magnetic



Resonance Waves) पिकाचे उत्पन्न वाढते.

* पेरणी करताना पट्टा पद्धतीने करावी, जेणेकरून मधल्या पट्ट्यात बैलाच्या किंवा लहान ट्रॅक्टरच्या सहायाने आंतरमशागत करून तणांचा प्रादुर्भाव कमी करता येतो (निंदण मजुरी वाचते) पिकाला भरपूर सूर्यप्रकाश मिळतो, जमिनीत हवा खेळती राहते. पिकाची काढणी सोयीची होते व उत्पन्न अधिक मिळते.

* चौफुली पद्धतीने लागवड करायची असेल तर दोन ओळीत दोन झाडांपेक्षा १५ ते ३० सें.मी. अंतर जास्त ठेवावे म्हणजे शेवटची पाळी एकेरी तरी शक्य होते. त्यामुळे तण कमी होते. जमिनीत हवा खेळती राहाते. खोडाला माती लावली जाऊन पीक भविष्यात पाणी टंचाईला तोंड देऊ शकते.

* पिकांच्या समाधानकारक वाढीसाठी आवश्यक मूलद्रव्यांचा पुरवठा होण्यासाठी आस्वाद पेंडी, गांडूळ खत, गांडूळ पाणी, बायोडायनामिक कंपोस्ट, बी.डी. तरल खत, सी.पी.पी., ट्रायकोकंपोस्ट, जीवामृत, गोमूत्र, गाईच्या ताज्या शेणाचे पाणी या निविष्ठांची गरज आहे.

* वरील निविष्ठांपैकी नेमकी कोणती निविष्ठा केव्हा, किती व का वापरावी याची माहिती उपलब्ध आहे. त्यानुसार त्याचा वापर केला पाहिजे.

* पिकावरील कीड व रोग व्यवस्थापनासाठी विनाकारण फवारण्या करू नयेत. आपल्या पिकांची अवस्था, शत्रुकिडींचे प्रमाण पाहूनच उपाययोजना करावी. पिकांवर सर्वसाधारणपणे ५% शत्रुकिडी व रोगाचे अस्तित्व गरजेचे आहे कारण त्यावरच कोट्यवधी मित्रकिडी व मित्रबुरशी जगतील व नैसर्गिक व्यवस्थापन मिळेल.





* पिकावरील शत्रुकीड, शत्रुबुरशी (रोग), तण यांच्या प्रादुर्भावाची आर्थिक नुकसानीच्या पातळीची (ETL - Economic Threshhold Limits) माहिती उपलब्ध आहे. ही पातळी ओलांडल्यानंतरच संरक्षणाची फवारणी हाती घ्यावी.

* कीड व रोग व्यवस्थापनातही पुढील निविष्ठा वापरता येतात. बायोडायनामिक निविष्ठा- सी.पी.पी., बीडी ५००, बीडी ५०१, गोमूत्र, औषधी ३ वनस्पतींचा अर्क (दशपर्णी, लमित, निंबोळी, आलमिका, पंचपर्णी इ.) याशिवाय प्रकाश सापळे, चिकट सापळे, कामगंध सापळे, जैविक कीड व रोगनाशके इत्यादी.

* वरील निविष्ठांपैकी कोणती, केव्हा, किती व का वापरली पाहिजे याची माहिती घेऊनच वापर करावा. त्यामुळे अनाठायी खर्च होणार नाही.

* तण व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांनी समजून घ्यावे की तण शत्रू नसून मित्र आहेत. (आदरणीय भास्कर सावे गुरुजी तणांना जमिनीची सख्खी मुलं व आपली पिके सावत्र मुलं समजतात.) शेतकऱ्यांचा तण काढण्यावर प्रचंड खर्च होतो. मजूर टंचाईही असते. हे सर्व कमी करता येते. हरळी, लव्हाळा, केना, काँग्रेस गवतावरही प्रभावी उपाय आहेत.

* तण आच्छादन, प्रमाणीकरण, विक्री व्यवस्थापन इत्यादी विषयांवर पुढे कधीतरी तपशीलवार जाणून घेऊ. ■